# डोळस

सुतेजा सुभाष दांडेकर
६६८ अ/२ मंगळवार पेठ
सातारा ४१५००२
9423318452

नविन वर्षाचे स्वागत करताना बरेच जण नविन
नविन संकल्प करीत असतात. तसेच या वर्षी मी
अंध व दिव्यांग लोकांचा आदर करायचा त्यांच्यासाठी
कांही तरी करायचे असा संकल्प केला आहे. हा
संकल्प करण्यामागे मोठे कारण दडले आहे ते ही
तुम्हाला सांगणारच आहे पण ह्या लोकांना कधीही
कमी लेखू नका. त्यांची कीव करु नका एवढे सांगू
शकेन.

एक अंध तरुण रोज कॉर्पोरेशनच्या त्या
बसस्टॉपवर उभा असतो. मी ज्या वारजेमाळवाडी
बसमध्ये चढतो तिथेच तो ही बसमध्ये चढतो. त्याच्या
पाठीवर सॅक असते त्यावर 'जीवनप्रकाश अंध शाळा,
माळवाडी' असे लिहीलेले असते. गर्दीमुळे त्याला
बसायला जागा मिळत नाही. बरेच जण त्याला जागा
देण्याचा प्रयत्न करतात पण हा विनम्रपणे नकार देतो

एके दिवशी योगायोगाने आम्ही दोघे एका
सीटवर बसलो. बऱ्याच दिवसांचे कुतुहल असल्या
मी त्याला विचारले "तुम्ही रोज बसला दिसता, पुढे
माळवाडीला जाता, विद्यार्थी आहात कां?"
"नाही, मी विद्यार्थी नाही. मी शिकवितो."
"अरे वा म्हणजे ब्रेल वाचायला शिकवितो कां?"
"नाही, मी ज्यांना शिकवितो ते ब्रेल मधील मा
आहेत. मी त्यांना काम्प्युटर ब्रेल कोड शिकवितो. अ

अंध व्यक्तींना उपयुक्त ब्रेल सॉफ्टवेअर डेव्हलप करण्यासाठी लागणारे कोडस् तिथल्या मुलांना शिकवितो. ही मुले पुढे ब्रेल प्रोग्रामर होतील. माझ्यासाठी हे नवीनच होते. मी म्हटले, " अरे वा, म्हणजे दिवसभर तुम्ही तिकडेच शिकवायला असता? "
" नाही, मी दुपारी परत येतो.. डेक्कनला आमच्या कंपनीत. तिथे आम्ही काही स्पेशल प्रोजेक्टसवर काम करतो. "

मला आश्चर्यच वाटले. तेवढ्यात तो म्हणाला,
" मॅडम, तुमचा स्टॉप आला आहे. "
" अरे, तुला कसे कळले? "
" जेव्हा तुम्ही तिकीट काढले तेंव्हाच माझ्या डोक्यातही एक प्रोग्राम देवाने अपलोड केला. त्याबद्दल सांगेन कधीतरी. "

खरे सांगू? आपल्या आंधळ्या दुनियेत आज मला डोळस माणूस भेटला. त्याच्या प्रखर प्रकाशात मी अक्षरशः दिपून गेले.



